**घनकचरा व्यवस्थापनासाठी शासकीय**
**जमिनीचा आगाऊ ताबा देण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## महसूल व वन विभाग

**शासन निर्णय क्रमांकः जमीन-२०२१/प्र.क्र.०२/ज-१**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ०१ फेब्रुवारी, २०२१.

**वाचा:-**

शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.जमीन-१०/२००५/प्र.क्र.३८/ज-१,
दिनांक ७.०३.२००६.

**प्रस्तावना :-**

महसूल विभागाच्या उक्त नमूद दिनांक ७.३.२००६ च्या शासन निर्णयानुसार काही अपवादात्मक प्रकरणात, निर्बाधरित्या वाटपास उपलब्ध असलेल्या नगरपालिका /नगरपरिषद हद्दीतील शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा राज्य/केंद्र शासनाच्या विविध विभागांना / उपक्रमांना देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रत्यायोजित करण्यात आले आहेत.

राज्यातील अनेक नगरपरिषद/ नगरपंचायती यांचेकडे घनकचरा व्यवस्थापनाकरिता स्वत:च्या मालकीच्या जागा उपलब्ध नसल्याने किंवा अपुरी असल्याने कचऱ्यावर प्रक्रीया होत नाही. बहुतांश नगरपरिषदांचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमा अंतर्गत विकास आराखडे तयार किंवा अंतीम झाले नसल्याने जागा आरक्षण होत नाही. अशा परिस्थितीत शासन निर्णय दिनांक ७.३.२००६ मधील तरतुदींमुळे शासनाच्या अधिपत्याखालील जागेचा आगाऊ ताबा अशा संस्थांना तातडीने मिळणे शक्य होत नाही. ही बाब विचारात घेऊन सदर शासन निर्णयात खालील प्रमाणे तरतुद अंर्तभूत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन शासन आता शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.जमीन-१०/२००५/प्र.क्र.३८/ज-१, दि.०७.०३.२००६ मधील परिच्छेद २ मधील मुद्दा क्र. (३) (ट) च्या पुढे (ठ) नव्याने समाविष्ठ करुन पुढील प्रमाणे तरतुद करण्यात येत आहे:-

**"(ठ)** ***काही तांत्रिक कारणामुळे विकास आराखडे मंजुर होण्यास काही कालावधी लागण्याची शक्यता असेल, अशा केवळ अपवादात्मक परिस्थितीत घनकचरा व्यवस्थापनासाठी जागा मंजुर करण्याची निकड विचारात घेऊन, विकास आराखडे मंजुर नसलेल्या प्रारुप / प्रस्तावित असलेल्या विकास आराखडयाच्या/ विकास आराखड्याचे काम अद्याप सुरु नसल्यास अशा नगर परिषदा व नगर पंचायती यांच्या सर्वसाधारण सभेने ठरावाद्वारे सदर जागेबाबत हमी दिली असल्यास जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समिती घनकचरा***



Scanned with OKEN Scanner

***व्यवस्थापनासाठी जागेच्या आवश्यकते संदर्भातील यथायोग्यतेबाबत सर्व बाबींची खातरजमा करुन जागा उपलब्धतेबाबत उचित निर्णय घेईल,"***

**०२.** सदर शासन निर्णय नगर विकास विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३८/२०२०/नवि-१३, दि.२४.१२.२०२० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

**०३.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०२०११५१०५४९६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( रमेश चव्हाण )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.मंत्री (महसूल), यांचे खाजगी सचिव
४) मा.मंत्री (वित्त व नियोजन), यांचे खाजगी सचिव
५) मा.राज्यमंत्री (महसूल), यांचे खाजगी सचिव
६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
७) मा. अपर मुख्य सचिव, (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग , मंत्रालय, मुंबई.
९) प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग , मंत्रालय, मुंबई.
१०) प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, यांचे स्वीय सहाय्यक
११) जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमीअभिलेख, पुणे.
१२) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१३) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
१४) सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी,
१५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
१६) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
१७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१८) निवासी लेखा अधिकारी, मुंबई
१९) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
२०) सर्व सहसचिव/उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१) सर्व "ज" समूह कार्यासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२) निवडनस्ती (कार्यासन ज-१).



Scanned with OKEN Scanner